

# हिवाळ्यात केळी बागांचे व्यवस्थापन

के.बी. पाटील

केळी बागायतदारांसाठी चालू वर्ष अतिशय चांगले राहीले. उन्हाळ्यापासून आजतागायत केळीचे दर साधारण ९ ते १६ मध्ये या दरम्यान राहीले, केळीची निर्यात मोठ्या प्रमाणात झाली. उत्पादन व गुणवत्ताही चांगली मिळाली. परंतु मागील वर्षातील दुष्काळी परिस्थिती व यावर्षी पावसाला उशिर झाल्याने ज्यांच्या जवळ पाण्याची शाश्र्वती होती त्यांनीच केळीची लागवड केली त्यामुळे मागील वर्षाच्या तुलनेत लागवडी चांगल्या झाल्या परंतु एप्रिल ते जुलै दरम्यान जास्त झाल्या. येणारा हंगाम व पुढील वर्ष चांगले राहणार असा अंदाज आहे. त्यासाठी बागांचे सध्याचे व्यवस्थापन अचुक करणे गरजेचे आहे.

## मृग बागांचे व्यवस्थापन :

एप्रिल, मे, जुन मध्ये लागवड झालेल्या बागांची वाढ आता जोमदार आहे. काही बागांनी निसवन (वेण) जोमाने सुरु झाली आहे. केळी बागायतदार गेल्या चार-पाच वर्षांपासून अतिशय उत्तमरित्या बागांचे व्यवस्थापन करीत असल्यामुळे पाच महिन्यातच बागांचा निसवा सुरु झाला आहे. बाग अतिशय सशक्त व जोमदार आहेत. हिवाळ्याची चाहूल लागली आहे. जळगाव, पुणे, अहमदनगर अशा अनेक जिल्ह्यामध्ये तापमान खाली आले. दिल्लीमध्ये थंडीची लाट आहे, त्यामुळे या बागांचे व्यवस्थापन योग्य केल्यास बागा थंड तापमानाला बळी पडणार नाहीत. जसे तापमान १६ अंशापेक्षा कमी होते तशी अन्न घटकांची उपलब्धता कमी होते. झाडांची पाण्याची गरज कमी असते. पर्यायाने पिकाची वाढ मंदावते आणि त्यात काही चूक झाली तर बागेवर विपरीत परिणाम होतो.

- एप्रिल–मे–जून लागवडीच्या बागा पूर्ण वाढीच्या व निसवण्याच्या अवस्थेत आहे.
- वाढीच्या अवस्थेच्या बागेला नियमित अन्नघटकांचा पुरवठा करणे गरजेचे आहे.
- एक हजार झाडांना दर दोन दिवसा आड युरिया ६ किलो, पांढरे पोटॅश किंवा सल्फेट पोटॅश ६ किलो फॉस्फॅरीक ॲसिड ५०० ग्रॅम किंवा १२:६१:० एक किलो + मॅग्नेशियम सल्फेट ५०० ग्रॅम याप्रमाणे फर्टिगेशन करावे.
- निसवा सुरु झाल्यानंतर निर्यातीसाठी बाग तयार करायची असल्यास केळफूल उभ्या अवस्थेत असताना व पन्नास टक्के बाहेर आलेले असताना बड इंन्जेक्शन करण्यासाठी इमीडाक्लोरीड अर्धा मिली प्रति लिटर पाण्यात घालून ८० मिली द्रावण प्रत्येक केळफुलामध्ये इन्जेक्ट करावे.
- केळीचा घड पूर्ण बाहेर आल्यानंतर केळीच्या फण्या मोकळ्या झाल्यानंतर केळीवरील फ्लोरेट तांबड्या रंगाचे झाल्यानंतर काढावे.
- घडावर क्लोरोपायरीफॉस २ मिली एक लिटर पाण्यात घेवून फवारणी करावी.
- घडावर फक्त ८–९ फण्या ठेवाव्या. दहावी फणी पूर्ण काढावी. अकराव्या फणीत एक केळी ठेवावी व केळ फुल कापावे.
- अकराव्या फणीत एक केळी ठेवल्याने घडाच्या दांड्याला सड लागत नाही व खालपर्यंतच्या सर्व फण्याची फुगवण चांगली होते.

- केळफूल तोडल्यानंतर घडावर ३० मायक्रॉनची ६ ते १०% छिद्रे असलेली आकाशी रंगाची व शुद्ध एलएलडीपीईची अल्ट्राव्हायलेट ट्रिटेड स्कर्टींग बॅग घालावी.



- अनेक केळी बागायतदार हिवाळ्यामध्ये केळी बागेला एक दोन आठवडा ठिबक सिंचन संच बंद ठेवतात, खते सुद्धा देत नाही. पर्यायाने बाग पिवळी होते. नंतर अवकाळी पाने करपतात त्याला ''चिलिंग इन्जुरी'' किंवा चरका असे म्हणतात. शेतकरी मात्र त्याला करपा रोग समजतात.
- पिवळ्या पांढऱ्या मातीच्या, चुनखडीच्या जमिनीत चरक्याचे प्रमाणे जास्त असते. त्यामुळे त्या बागांची जास्त काळजी घ्यावी लागते.
- तापमान ७ किंवा ८ अंशाला खाली आले तर बागेमध्ये १ कि. ग्रॅ. सल्फर प्रति हजारी ठिबकद्वारे सोडावे. असे महिन्यातून तीन वेळा सोडावे.
- बागेचा निसवा सुरू झाल्यानंतर युरिया २.५ किलो + पांढरेपोटॅश किंवा सल्फेट ऑफ पोटॅश ६ किग्रॅ/ फॉस्फेरीक ॲसीड २५० ग्रॅम प्रतिहजारी दर चौथ्या दिवशी सोडावे.
- लागवडीपासून चौथ्या महिन्यापासून कॅल्शियम नायट्रेट २.५ किलो हजारी दर आठवड्याला एक हजार झाडांना सोडावे. उपलब्ध कॅल्शियम जमिनीत व पाण्यात जास्त असल्यास सोडण्याची गरज नाही.
- दर आठवड्याला २.५ किलो किंवा दर चौथ्या दिवशी एक किलो मॅग्नेशियम सल्फेट एक हजार केळी रोपांना सोडावे जेणे करून थंडीचा परिणाम कमी होईल.
- बागेला पाणी रात्रीच्या वेळेस द्यावे व दररोज प्रति झाड २० ते २२ लिटर पाणी दिले जाईल या पद्धतीने ठिबक सिंचन संच चालवावा.
- झाडाजवळील पिले नियमित कापावी.

बागेत थंड वारे शिरू नये म्हणून शिवरी, गजराज गवत लावून वारा विरोधक तयार करावे.

- बागेमध्ये ठिकठिकाणी गव्हाचा किंवा भाताचा भुसा किंवा सॉमील मधील लाकडांचा भुसा रात्रीच्या वेळेस जाळावा त्यामुळे १ ते २ अंश तापमान वाढते.
- डिसेंबर-जानेवारी मध्ये कापणी होणाऱ्या बागांना त्वरीत स्कर्टींग बॅग घालावी जेणे करून कच्च्या केळीवर चिलिंग इन्जुरी होणार नाही. केळींना चिलिंग इन्जुरी झाल्यास केळ्याला चांगला पिवळा रंग येत नाही व केळी निर्यातीस चालत नाही.





- जानेवारी पासून निर्यातीची मागणी वाढेल. तसेच देशांतर्गत मागणी सुद्धा वाढेल त्यामुळे केळीची गुणवत्ता व चांगले उत्पादन मिळण्यासाठी अचूक व्यवस्थापन गरजेचे आहे.

**ऑक्टोबर-नोव्हेंबर डिसेंबर लागवडीच्या बागांचे व्यवस्थापन**

- या लागवडीला कांदेबाग असे म्हणतात.
- लागवड गादी वाफ्यावर व मल्चिंग करून करावी त्यामुळे थंडीचा परिणाम कमी होतो.
- लहान व नवीन लागवडीच्या बागांची वाढ थंडीमध्ये मंदावते त्यासाठी नियमित ठिबक संच रात्रीला चालवावा प्रति झाड फक्त ८ ते १० लिटर पाणी द्यावे.
- मुळाच्या कक्षेत चिखल होईल असे पाणी देवू नये. जमीन कायम वाफसा स्थितीत राहील असे पाणी घ्यावे.
- या लागवडीच्या बागांना नियमित फर्टिगेशनची गरज आहे. युरिया ४.५ किलो, फॉस्फेरिक ॲसिड १ किलो किंवा १२:६१:० दोन किलो आणि पांढरे पोटॅश सहा किलो किंवा ०:०:५० सहा किलो, मॅग्नेशियम ५०० ग्रॅम प्रतिहजारी दर चौथ्या दिवशी सोडावे.
- थंड तापमानामुळे अन्न घटकाचा अपटेक कमी असतो. त्यासाठी, सुक्ष्म अन्नद्रव्य ३० ग्रॅम, प्लॅन्टो ३० मिली, १३:०:४५ – ५० ग्रॅम १५ लिटर पाण्यात मिसळून लहान बागांवर दर आठवड्याला फवारावे. शेजारील शेतात मिर्ची, टोमॅटो, टरबूज, कांदा, मका, कापूस पिकाची लागवड असल्यास सीएमव्ही रोग येण्याची शक्यता असते. त्यासाठी बागेवर दर आठवड्याला आंतरप्रवाही कीटकनाशकांची फवारणी करून रस शोषणाऱ्या किडींचे नियंत्रण करावे जेणेकरून व्हायरसचा प्रादुर्भाव होणार नाही
- शंभर टक्के व्हायरस इन्डेक्सिंग केलेल्या रोपांची लागवड करावी. बागेमध्ये तण होऊ देवू नये जेणे करून व्हायरस वर नियंत्रण राहील. बागेभोवती शेडनेट लावावी ज्यामुळे थंड वाऱ्यापासून संरक्षण होईल.



यावर्षी सर्वत्र उशिरा पाऊस झाला आहे त्यामुळे थंडीचे प्रमाण जास्त राहणार आहे. आतापासून बागांचे व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने व योग्य वेळेस केल्यास निश्चितच बागा चांगल्या ठेवण्यास मदत होईल. केळीचे मार्केट चांगले राहणार आहे. त्यासाठी गुणवत्ता व उत्पादन चांगले मिळाले तर निश्चितच केळीचे पिक आर्थिकदृष्ट्या परवडेल.